Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ८, अंक ३०] गुरुवार ते बुधवार, ऑक्टोबर २०-२६, २०२२/आश्विन २८-कार्तिक ४, शके १९४४ [ पृष्ठे ४, किंमत : रुपये ११.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक-अ—नागपूर विभागीय पुरवणी

**(भाग चार-ब मध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिकाबरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ९७.

**नगर विकास विभाग**

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक १२ ऑक्टोबर, २०२२.

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६.**

**अधिसूचना**

क्रमांक टिपीएस-२७२१-५३३-प्र.क्र.२०-२०२१-नवि-०९.—

ज्याअर्थी, शासन, नगर विकास विभाग अधिसूचना क्र. टीपीएस-२७१६-प्र.क्र.२८(अ)-२०१६-नवि-९, दि. २० डिसेंबर २०१६ अन्वये गडचिरोली शहरासाठी सुधारित विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा. ३७ वा) यापुढे "उक्त अधिनियम" असे संबोधले आहे) चे कलम ३१(१) अन्वये भागशः मंजूर (यापुढे "उक्त विकास योजना" असे उल्लेखिलेली) असून दिनांक ०६ फेब्रुवारी २०१७ पासून अंमलात आलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेसाठी गडचिरोली, नगर परिषद नियोजन प्राधिकरण आहे (यापुढे "उक्त नियोजन प्राधिकरण" असे संबोधले आहे) ;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेमध्ये मौजे रामपूर तुकूम येथील सर्व्हे क्र. १२/४ मधील जागा (यापुढे "उक्त जागा" असे संबोधले आहे) १८.०० मी. रुंद विकास योजना रस्त्याने (यापुढे "उक्त भूवापर" असे संबोधले आहे) बाधित होत आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त नियोजन प्राधिकरणाने त्यांच्या सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. ३८, दिनांक ०४-०६-२०१८ अन्वये उक्त विकास योजनेत फेरबदल करून उक्त भूवापराने बाधित जागेमधील अस्तित्वातील ७.५० मी. रुंद रस्त्याचे क्षेत्र सोडून उर्वरीत जागा उक्त भूवापर विभागातून वगळून रहिवास विभागात समाविष्ट करण्याबाबत प्रस्तावित करण्याचे ठरवून उक्त अधिनियमाचे कलम ३७(१) अन्वये सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण करून प्रस्ताव दि. १८ डिसेंबर २०१८ च्या पत्रान्वये शासनास मान्यतेसाठी सादर केलेला आहे (यापुढे उक्त फेरबदल प्रस्ताव असे संबोधले आहे) ;

आणि ज्याअर्थी, आवश्यक ती चौकशी केल्यानंतर आणि संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेशी सल्लामसलत केल्यानंतर, उक्त फेरबदलाचा प्रस्ताव मान्य करावा, असे राज्य शासनाचे मत झाले आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त जमीन मालकानी शासनाच्या धोरणानुसार सन २०२२-२३ या वर्षातील बाजारमूल्यदर तक्त्यातील उक्त जागेच्या मूल्याच्या ५% दराने येणा-या अधिमूल्य रक्कमेपैकी ५०% शासनास देय असलेली अधिमूल्याची रक्कम रुपये ३,३८,८००/- सहायक संचालक, नगर रचना, गडचिरोली शाखा, गडचिरोली यांचेकडील लेखाशिर्षामध्ये दिनांक २९ ऑगस्ट २०२२ रोजी जमा केलेली आहे आणि नियोजन प्राधिकरणास देय असलेली ५०% अधिमूल्याची रक्कम रुपये ३,३८,०००/- मुख्याधिकारी, गडचिरोली, नगरपरिषद, गडचिरोली या कार्यालयास दिनांक ०१ सप्टेंबर २०२२ रोजी जमा केलेली आहे.

आता, त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ३७ चे उपकलम (२) अन्वये व त्या अनुषंगाने प्राप्त असलेल्या इतर अधिकारांचा वापर करून उक्त विकास योजनेतील प्रस्तावित फेरबदलास शासन पुढील प्रमाणे मान्यता देत आहे आणि त्यासाठी उपरोल्लिखित दि. २० डिसेंबर २०१६ ची विकास योजना मंजुरीची अधिसूचना सुधारित करण्यात येत आहे.

" उक्त विकास योजना मंजुरीच्या दि. २० डिसेंबर २०१६ रोजीच्या अधिसूचनेच्या फेरबदल सूचीतील शेवटच्या नोंदीनंतर पुढील नव्या नोंदीचा समावेश करण्यात येत आहे."

**नोंद**

मौजे रामपूर तुकूम येथील सर्व्हे क्र. १२/४ मधील १८.०० मी. रुंद विकास योजना रस्त्याने बाधित क्षेत्रापैकी बिनशेती अभिन्यासानुसार मध्यभागी उत्तर दक्षिण ७.५० मी. रुंद रस्ता कायम ठेवून उर्वरित क्षेत्र नकाशात दर्शविल्यानुसार, रहिवास विभागात समाविष्ट करण्यात येत आहे.

सदरची अधिसूचना जनतेच्या अवलोकनार्थ, मुख्याधिकारी, गडचिरोली नगर परिषद, गडचिरोली, जि. गडचिरोली यांच्या कार्यालयात, एका महिन्याच्या कालावधीसाठी, कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत उपलब्ध राहील.

सदर अधिसूचना शासनाच्या www.maharashtra.gov.in आता, या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**देवदत्त रहाणे,**
कार्यासन अधिकारी.

---

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ९८.

URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, Date 12th October, 2022

MAHARASHTRA REGIONAL & TOWN PLANNING ACT, 1966.

**Notification**

No. TPS-2721-533-CR-20-2021-UD-09.—

Whereas, the Government in Urban Development Department, *vide* Notification No. TPS-2716-CR-28(A)-2016-UD-09, dated 20 December 2016 has Partly sanctioned the revised Development Plan for Gadchiroli City (hereinafter referred to as ' the said Development Plan') under Section 31(*1*) of the Maharashtra Regional and Twon Planning Act, 1966 (Mah. XXXVII of 1966) (hereinafter referred to as " the said Act") and the same has come into force with effect from dated the 06 February 2017;

And whereas, the Gadchiroli, Municipal Council is the Planning Authority for the said Development Plan (hereinafter rreferred to as " the said Planning Authority ");

And whereas, in the said Development Plan, land bearing Survey No. 12/4, of Mouje Rampur Tukum (hereinafter referred to as " the said land ") is affected by 18.00 meter wide Development Plan Road (hereinafter referred to as " the said use ");

And Whereas, the said Planning Authority *vide* its General Body Resolution No. 38, dated 04th June 2018 resolved to modify the said Development Plan by deleting the part of said land, except area under 7.50 meter existing road from the said use and to be included in Residential Zone (hereinafter referred to as " the said Modification Proposal ") by carrying out a modification to the said Development Plan, by following all the legal formalities stipulated under the said Act, submitted the proposal to Government for sanction *vide* letter dated 18th December 2018;

And whereas, after making necessary enquiries and consulting the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, the Government is of the opinion that the proposed Modification should be sanctioned ;

And whereas, the land owners of the said land as per the Government policy have deposited Rs. 3,38,800/- towards the 50% Government share of premium amount a per the 5% rate of the said lands as prescribed in the Annual Statement of Rates (ASR) for the year 2022-23 in the Government Treasury on 29th August 2022 through the Assistant Director of Town Planning, Gadchiroli Branch, Gadchiroli and remaining 50% of the premium amount Rs. 3,38,800/- payable to the Planning Authority has been deposited with the Chief Officer, Gadchiroli, Municipal Council, Gadchiroli on 01st September 2022 ;

Now, therefore, in exercise of the powers conferred on it under sub-section (*2*) of Section 37 of the said Act, the Government hereby, sanctions the Proposed Modification and for that purpose amends the aforesaid Notification dated 20th December 2016.

" In the Schedule of Modifications appended to the aforesaid Notification dated 20th December 2016 sanctioning the said Development Plan, the following new entry shall be added of the last entry "—

*ENTRY*

The area, affected by 18.00 meter *wide* Development Plan road, except area under 7.50 meter wide North-South road in center as per Non-agriculture layout, is deleted from Development Plan road and land thus released, is included in Residential Zone as shown on the plan.

This Notification shall be kept open for inspection by the general public during office hours, for the period of one month in the office of the Chief Officer, Gadchiroli Municipal Council, Gadchiroli, District Gadchiroli.

This notification shall also be published on the Government web-site *www.maharashtra.gov.in*

By order and in the name of the Governor of Maharashtra,

DEODATTA RAHANE,
Section Officer.

---

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ९९.

## आयुक्त, चंद्रपूर शहर महानगरपालिका, यांजकडून

### अधिसूचना

क्रमांक चंशमनपा-नर-१८३९-२०२२.—

ज्याअर्थी, चंद्रपूर शहराची विकास योजना (वाढीव क्षेत्र) शासनाचे नगर विकास विभाग, मुंबई कडील ठराव क्र. टिपीएस-२२९४-१३१५-सिआर-२५३-९६-युडी-९, दिनांक ०२ जून १९९७ अन्वये मंजूर झालेली असून ती दिनांक १५ ऑगस्ट १९९७ पासून अंमलात आलेली आहे. तसेच शासनाचे नगर विकास विभागाकडील आदेश क्र. एमसीओ-२०२०-प्र.क्र.७१(भाग-२)-नवि-१४, दिनांक २८ एप्रिल २०२२ अन्वये चंद्रपूर महानगरपालिका येथे प्रशासक पदी आयुक्त, चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूरचे प्रशासकीय ठराव क्र. ४९, दिनांक १८ ऑगस्ट २०२२ अन्वये चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूरने विकास योजना आराखड्यात महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये विकास योजना चंद्रपूर मध्ये खाली दिलेल्या तपशीलाप्रमाणे फेरबदल करण्याचा प्रस्ताव केला आहे.

### अनुसूची

| मौजा/सर्व्हे नं. | क्षेत्रफळ | विकास योजनेतील पस्ताव | किरकोळ बदल केल्यानंतर होणारा प्रास्ताविक उपभोग |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| | हे. आर | | |
| मौजा देवई गोविंदपूर रै., सर्व्हे नं. १०७/१ ड पैकी मधील जागा | ० ७० | प्राथमिक शाळा, सिव्हीक सेंटर व लायब्ररी | निवासी वापर |

उपरोक्त किरकोळ फेरबदल दाखविणारा नकाशा व त्या संबंधीची माहिती देणारा अहवाल चंद्रपूर शहर माहनगरपालिकेच्या कार्यालयात कामकाजाचे वेळात अवलोकनार्थ उपलब्ध आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये असे उद्‌घोषित करण्यात येते की, सदरहू किरकोळ स्वरुपाच्या बदला संबंधी ज्या कोणाला काही हरकती अगर सूचना असतील तर त्यांनी ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याचे आत त्या आयुक्त, चंशमनपा. चंद्रपूर यांचेकडे लेखी स्वरूपात सादर कराव्यात. अशा सूचना व हरकतींवर वैधानिक कार्यवाही पार पाडून सदरहू फेरबदलाचा प्रस्ताव शासनास गुणवत्तेनुसार निर्णय घेण्यास सादर करण्यात येईल.

विपीन पालीवाल,

चंद्रपूर : आयुक्त,

दिनांक २० सप्टेंबर २०२२. चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर.

---

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १००.

BY THE COMMISSIONER, MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF CHANDRAPUR

**Notification**

No. MCCC-TP-1839-2022.—

Whereas, the Development Plan of Chandrapur Town (Extended Area) is sanctioned by the Urban Development Department, Govt. of Maharashtra *vide* Resolution No. TPS-2294-1315-CR-253-96-UD-9, Dated 2nd June 1997 which came into force from 15th August 1997. Also the Commissioner, Chandrapur City Municipal Corporation Chandrapur has been appointed as on the Administrative Post of Chandrapur Municipal Corporation by the Urban Development Department, Govt. of Maharashtra *vide* Order No. MCO-2020-C.R.71 (Part-2)-UD-14, Dated 28th April 2022.

And now, Municipal Corporation of the city of Chandrapur has proposed to make Minor Modification in the aforesaid Final Development Plan *vide* Government Resoulation No. 49, dated 18th August 2022 under Section 37 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 as follows ;

SCHEDULE

| Mouza/Survey No. | Area | Present Development Plan Use | Proposed use as per Modification |
|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) |
| | H. A. | | |
| Mouza Dewai Govindpur Raiyyatwari, Survey No. 107/1 D (Part), Land under above Survey No. | 0 70 | Primary School, Civic Center & Library | Residential |

The plan and reports containing the description of the above modification can be seen in the office of the Municipal Council, Chandrapur during the office hours.

Now, in pursuance of Section 37 of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 it is hereby notified that any person having any suggestions or objections to the proposed modification as mentioned above shall communicate the same in writing to the undersigned within one month from the date of publication of this notification in the *official Gazette.* The objections or suggestions, if any received within the above mentioned period of one month will be considered for compliance of judicial procedure by the Commissioner, Municipal Corporation of the City of Chandrapur while submitting the proposal of Modification to the Government for decision on merit basis.

VIPIN PALIWAL,

Chandrapur : Commissioner,

Dated the 20th September 2022. Municipal Corporation of the City of Chandrapur.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.